# वर्धा जिल्हा पोलीस वार्तापत्र

**दिनांक : 28.10.2018**

## पो.स्टे. रामनगर हद्दीत दारूबंदी कायद्यान्वये कारवाई 21 लाखाचा माल जप्त

| | | |
|---|---|---|
| स्था.गु.शा. ची कारवाई (फोटो सह) | अप.क्र. 809/2018 कलम 65अ, ई, 77अ, 83 मुंबई दारूबंदी कायदा 3(1)/181, 130/177 मो.वा.का. | दिनांक 28.10.2018 रोजी स्था.गु.शा. वर्धा येथील पथकास माहिती मिळाली की, एक पांढ–या रंगाची विना क्रमांकाची महेंद्रा बोलेरो गाडी अमरावती येथून बल्लारशाह येथे देशी दारू माल वर्धा परीसरातून वाहतूक करीत आहे अशा माहितीवरून पो.स्टे. रामनगर परीसरात शांतीनगर चौक वर्धा येथे सापळा लावून नाकाबंदी करीत असतांना सदर वाहन शिताफीने अडविण्यात आले.<br>वाहनात समोर टमाट्यांचे कॅरेट ठेवून त्यामागे खड्र्याचे खोक्यामध्ये देशी दारू ठेवून असलेले दिसून आले. वरून सदर वाहनातील इसमास ताब्यात घेवून त्यास त्याचे नाव गांव विचारले असता त्यांनी 1) विनोद तुकाराम आडे, वय 31 वर्षे, रा. गिरीपेठ, कारला चौक, वर्धा 2) रवी सदाशीवराव नेहारे, वय 21 वर्षे, रा. आदीवासी कॉलनी, वर्धा (1 व 2 अटक) असे सांगीतले. त्याचे ताब्यातून 1) 140 खड्र्याचे खोक्यात एकूण 14000 देशी दारूच्या बॉटल्स् कि. 14,00,000/–रू, कॅरेट, मोबाईल व वाहन कि. 7,00,000/रू असा एकूण जू.कि. 21,08,500/–रू चा माल जप्त करण्यात आला व आरोपीविरूध्द पोस्टे रामनगर येथे अप.क्र. 809/2018 कलम 65अ, ई, 77अ, 83 मुंबई दारूबंदी कायदा 3(1)/181, 130/177 मो.वा.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे.<br>सदर कारवाई मा. प्र. पोलीस अधिक्षक सा. श्री. निखील पिंगळे यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री निलेश ब्राम्हणे, स्था.गु.शा., वर्धा यांचे निर्देशांप्रमाणे पो.हवा. सलाम कुरेशी, स्वप्नील भारद्वाज, ना.पो.शि. मनीष श्रीवास, कुणाल हिवसे, जगदीश डफ, पो.शि. प्रदीप वाघ सर्व स्था.गु.शा., वर्धा यांनी केली. |

**पोलीस अधिक्षक, वर्धा करीता**